# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन सूचना क्र. ०७ /२०२४

क्र.संगाबाअवि/१/१०२/ई-१९(एम)/७-७९/२०२४ दिनांक 02/02/२०२४

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२४**

संदर्भ : विनियम क्र. १/२०२३ ( विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०२३)

उपरोक्त विषयाबाबत विद्यापीठाद्वारे विहित करण्यात आलेल्या संदर्भांकित विनियमाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरील विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in)Awards and Achivements या शिर्षका अंर्तगत उपलब्ध असून विद्यापीठातील शिक्षक /प्रथम श्रेणी अधिकारी/द्वितीय श्रेणी अधिकारी/तृतीय श्रेणी कर्मचारी/चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल विद्यापीठाच्या वर्धापन दिनी १ मे, २०२४ रोजी पुरस्कारास पात्र ठरणाऱ्यांचा गौरव करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे गटाची वर्गवारी करण्यात आली आहे.

- अ) शिक्षक
- ब) प्रथम श्रेणी अधिकारी
- क) द्वितीय श्रेणी अधिकारी
- ड) तृतीय श्रेणी कर्मचारी
- इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी

विद्यापीठ आस्थापनेत सलग ५ वर्षे सेवा झालेल्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपरोक्त ५ गटांमधून प्रत्येकी दोन (एक महिलांकरीता राखीव) याप्रमाणे खालील स्वरूपाचा पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र २) शाल व श्रीफळ ३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in)Awards and Achivements या शिर्षका अंर्तगत उपलब्ध असलेला विहित प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह **६ संचामध्ये** आपले विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांना सादर करावा.

विभाग प्रमुखांनी/नियंत्रण अधिकाऱ्यांनी विनियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणाऱ्या तथा गौरवाकरीता पात्र वाटणाऱ्या उक्त नमुद गट अ, ब आणि क मधून शिक्षक / अधिकारी आणि गट ड व इ मधून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अर्ज आवश्यक सहपत्र तथा अभिप्रायासह **६ संचामध्ये** गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचेकडे **३१ मार्च २०२४, दुपारी ५.०० वाजेपर्यंत** पाठवावयाचे आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे व अपूर्ण अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**<u>महत्वाचे</u>**

**प्रस्तुत अर्जासह विनियमातील परिच्छेद १० मध्ये दिलेल्या निकषाच्या पुष्ठ्यर्थ व इतर जी सहपत्रे जोडण्यात येतील त्या सर्वांना न चुकता अनुक्रमांक देऊन त्याची अनुक्रमणिका सहपत्रांच्या सुरुवातीस जोडण्यात यावी. सहपत्रांची पुस्तिका हाताळणीस सहज सुलभ असावी व जोडलेल्या अनुक्रमणिकेनुसार सदर सहपत्रे पताकांकित करून क्रमवार लावावी. यानुसार सदर प्रस्ताव नसल्यास ते स्विकृत होणार नाहीत व अशा आणि अपूर्ण प्रस्तावासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

प्रस्तुत बाबीचे प्रयोजन हे विद्यापीठ शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यक्षम सहयोगातून मिळणाऱ्या सेवेचा यथोचित गौरव व्हावा व या प्रेरणेतून आपल्या कामाच्या उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागून कामकाजासंबधी अधिक सकस, गुणवत्तापूर्ण व कार्यक्षम वातावरण निर्माण व्हावे या हेतूने, वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत शिक्षक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन या गौरवपूर्ण उपक्रमात त्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे, ही विनंती.

(डॉ.तुषार आर.देशमुख)
कुलसचिव

प्रति : सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/प्रशासकीय विभागांचे नियंत्रण अधिकारी, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**महत्त्वाचे/कालमर्यादित** क्र.संगाबाअवि/१/१०२/ई-१९(एम)/9-190 /२०२४

**इमेल व्दारे** दिनांक :02/02/ २०२४

प्रति,

प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२४**
संदर्भ : विनियम क्र.१/२०२३ (विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०२३)

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठाद्वारे विहित करण्यात आलेल्या संदर्भांकित विनियम क्र. १/२०२३ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरिल विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in)Awards and Achivements या शिर्षकाअंतर्गत उपलब्ध असून त्यानुसार संबंधित गटातून पात्र ठरणाऱ्या महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा, त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल विद्यापीठाच्या वर्धापन दिनी १ मे, २०२४ रोजी गौरव करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे गटांची वर्गवारी करण्यात आली आहे.

**महाविद्यालय स्तर :** अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक
ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक
क) संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेतर कर्मचारी

महाविद्यालयाच्या आस्थापनेत प्राचार्य/संचालक-३ वर्षे, शिक्षक/शिक्षकेतर-५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांमधून उपरोक्त ३ गटांत प्रत्येकी दोन (एक महिलांकरीता राखीव) याप्रमाणे खालील स्वरूपाचे पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र** **२) शाल व श्रीफळ** **३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून (www.sgbau.ac.in)Award and Achivements या शिर्षकाअंतर्गत उपलब्ध असलेल्या विहित प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह **६ संचामध्ये** महाविद्यालयांच्या प्राचार्य/संचालक/संस्थाप्रमुखांमार्फत सादर करावा.

संबंधितांनी विनियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणाऱ्या तथा गौरवाकरीता पात्र वाटणाऱ्या गटनिहाय प्राचार्य/संचालक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अर्ज महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक यांचे संदर्भात संबंधित संस्थाचालकांनी तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे संदर्भात प्राचार्यांनी / संस्था प्रमुखांनी त्यांचे अभिप्राय तथा शिफारस नोंदवून आवश्यक सहपत्रांसह व त्यांच्या मागील सलग ५ वर्षाच्या विहित नमुन्यातील गोपनीय अहवालाच्या प्रमाणित प्रतींसह **६ संचामध्ये** गोपनियरित्या, मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे दि. ३१ मार्च २०२४, दुपारी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी** पाठवावयाचे आहेत. विनियमाप्रमाणे प्रस्ताव स्वीकारण्याची अंतिम तिथी दि. ३१ मार्च २०२४ असल्यामुळे डाकेने पाठविण्यात येणारे प्रस्ताव दि. ३१ मार्च २०२४ किंवा तत्पुर्वी विद्यापिठाकडे पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

याशिवाय सदर प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेल्या विनियमातील मुद्दा क्र. ७ नुसार **नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संदर्भात महाविद्यालयाचे / संस्थेचे प्रस्ताव** असल्यास ते सुद्धा विहित मुदतीत सहा प्रतींमध्ये विद्यापीठास सादर करण्यात यावेत.

**महत्वाचे**

**प्रस्तुत अर्जासह विनियमातील परिच्छेद १० मध्ये दिलेल्या निकषाच्या पुष्ठ्यर्थ व इतर जी सहपत्रे जोडण्यात येतील त्या सर्वांना न चुकता अनुक्रमांक देऊन त्याची अनुक्रमणिका सहपत्रांच्या सुरुवातीस जोडण्यात यावी. सहपत्रांची पुस्तिका हाताळणीस सहज सुलभ असावी व जोडलेल्या अनुक्रमणिकेनुसार सदर सहपत्रे पताकांकित करून क्रमवार लावावी. यानुसार सदर प्रस्ताव नसल्यास ते स्वीकृत होणार नाहीत व अशा आणि अपूर्ण प्रस्तावासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

प्रस्तुत बाबीचे प्रयोजन हे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यक्षम सहयोगातून विद्यापीठ व महाविद्यालयास मिळणाऱ्या सेवेचा यथोचित गौरव व्हावा व या प्रेरणेतून आपल्या कामाच्या उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागून कामकाजासंबधी अधिक सकस, गुणवत्तापूर्ण व कार्यक्षम वातावरण निर्माण व्हावे या हेतूने, वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन या गौरवपूर्ण उपक्रमात त्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.तुषार आर.देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

(असाधारण)

**शुक्रवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३**

**विनियम क्र. ०१/२०२३**

**विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०२३**

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाला दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल तसेच संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव करावयाचा निर्णय घेतलेला आहे.

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनार्थ विनियम क्र.३/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे,

आणि

ज्या अर्थी, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट'सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या विनियम क्र.३/२०१८ मध्ये अधिसभा ठराव क्र.१०४(२), दि.१२.३.२०२२ नुसार विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट'सेवा गौरव पुरस्कार संख्येत दुप्पट वाढ करुन, प्रत्येक वर्गवारीतील एक पुरस्कार महिलांसाठी राखीव ठेवण्याची बाब विचारात घेऊन विनियम क्र.३/२०१८ मध्ये दुरुस्तीची शिफारस करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली आहे.

आणि

ज्या अर्थी, सदर समितीने अस्तित्वात असलेला विनियम क्र.३/२०१८ निरस्त करुन सदर प्रयोजनार्थ सुधारणेसह नविन विनियम निर्गमित करण्याची शिफारस केली आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ पुढील प्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे.

१) हे विनियम "विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम क्र. ०१/२०२३" असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या दिनांकापासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या -**

**अ)** या विनियमातील " विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक, विभाग प्रमुख, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, संलग्न महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय, मान्यता प्राप्त संस्था " म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, परिनियम, अध्यादेश व शासनाद्वारे अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरीता निर्गमित केलेले आदेश, यामध्ये नमूद केलेल्या परिभाषा.

**ब)** "समिती" म्हणजे सदर विनियमांतर्गत द्यावयाच्या पुरस्कारासाठी पात्र असलेल्यांची निवड करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेद्वारा मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती.

**क)** "गौरव" म्हणजे विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर नियमांतर्गत द्यावयाचा पुरस्कार

**४) सदर प्रयोजनार्थ मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. कुलगुरू | .... | अध्यक्ष |
| २) व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले व्य. प. चे दोन सदस्य | .... | सदस्य |
| ३) मा.कुलगुरु नामित शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय योगदान असलेली व्यक्ती | .... | सदस्य |
| ४) कुलसचिव नामित एक विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी | .... | सदस्य |
| ५) कुलसचिव | .... | सचिव |

**५) पुरस्काराची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील.**

**अ) विद्यापीठ स्तर -**

| | | **पुरस्कार संख्या** |
|---|---|---|
| (अ) शिक्षक | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (ब) प्रथम श्रेणी अधिकारी | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (क) द्वितीय श्रेणी अधिकारी | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (ड) तृतीय श्रेणी कर्मचारी | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था स्तर**

| | | **पुरस्कार संख्या** |
|---|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |
| (क) संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी | - | दोन (एक महिलांकरीता राखीव) |

**६) गौरव पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील.**

(अ) प्रमाणपत्र ( परिशिष्ट - ड )

(ब) शाल व श्रीफळ

(क) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक, ज्यावर एका बाजूने विद्यापीठाची मुद्रा (मोनोग्राम) व दुसऱ्या बाजूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन - गौरवप्राप्त प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, १ मे ----- असे नमूद केलेले असेल. (परिशिष्ट - इ )

७) समितीला योग्य वाटल्यास संलग्नित महाविद्यालय, स्वायत्त संस्था यामध्ये राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपुर्ण उपक्रमाबद्दल (Innovative Practices) एका महाविद्यालयाला प्रोत्साहनपर रू. ५००१/- (अक्षरी रू. पाच हजार एक फक्त) रोख पुरस्कार व प्रशस्ती पत्र देऊन गौरवान्वित करण्यात येईल.

८) मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली दरवर्षी १ मे रोजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी ध्वजारोहणानंतर विशेष कार्यक्रमात गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

९) गौरवानिमित्त पारितोषिक / प्रशस्तीपत्र प्राप्त करणाऱ्या व्यक्ती/ महाविद्यालय याकरीता खालील अधिकारी पुरस्कारक राहतील.

| | | |
|---|---|---|
| अ) प्राचार्य / संचालक | - | मा.कुलगुरु नामित अधिष्ठाता * |
| ब) शिक्षक | - | संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता * |
| क) प्रथम व द्वितीय श्रेणी अधिकारी | - | कुलसचिव |
| ड) तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | कुलसचिव |
| इ) महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था | - | कुलसचिव |

**(* अधिष्ठाता नसल्यास मा.कुलगुरु नामित शिक्षक)**

१०) गौरवासाठी निवड करतांना खालील निकष विचारात घेण्यात येतील.

**अ) प्राचार्य /संचालक/ शिक्षकांकरीता -**

i) विद्यापीठात/ महाविद्यालयात सलग किमान (प्राचार्य/संचालक-३ वर्षे/शिक्षक- ५ वर्षे) सेवा

ii) वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्यात तंत्रज्ञानाचा वापर

iii) विषयासंबंधीच्या परिषदामधील सहभाग
iv) शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग (संपादक, प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग)
v) प्रकाशित झालेले शोधनिबंध
vi) प्रकाशित झालेले पुस्तके
vii) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य/विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
viii) विद्यापीठाच्या कार्यक्रमात, उपक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्ष घेतलेला सहभाग.
ix) विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीवरील निवड / नियुक्ती.
x) विभागाच्या विकासात्मक कामातील रूची
xi) संचालित होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभाग
xii) नॅकचे मानांकन मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न
xiii) एपीआय गुणांकन.
xiv) मागील सलग पाच वर्षांच्या (प्राचार्य, संचालकांसाठी ३ वर्षे) गोपनीय अहवालाचा दर्जा.
xv) इतर

**ब) अधिकारी / कर्मचाऱ्यांकरीता -**

i) सलग किमान ५ वर्षे सेवा
ii) कार्यालयातील उपस्थितीची नियमितता
iii) शैक्षणिक पात्रता
iv) कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा
v) वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण
vi) कार्यालयीन कामकाजात उत्स्फूर्त पुढाकार
vii) गोपनीय दर्जाचे काम / महत्वाचे दस्तऐवज सांभाळण्याची क्षमता
viii) वरिष्ठांशी, सहकाऱ्यांशी व जनतेशी संबंध
ix) विश्वसनियता
x) ज्ञानस्तर
xi) कार्यालयीन काम पूर्ण करण्याची रूची
xii) अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याचे कौशल्य
xiii) मागील सलग पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाचा दर्जा.
xiv) इतर

**११) पुरस्कारासाठी अर्ज करण्याची पद्धती.**

**अ)** संलग्नित महाविद्यालये / प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये दरवर्षी दिनांक ५ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा लागेल. उपरोक्त अर्जाचा नमुना विनियम क्र. ०१/२०२३ सह विद्यापीठाच्या संकेत स्थळावर व कार्यालयात उपलब्ध राहील. विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून विहित नमुना उपलब्ध करून घेऊन (Download) अर्ज सादर करावा. विद्यापीठाच्या स्तरावर कार्यालयीन सूचना निर्गमित करण्यात यावी व महाविद्यालयांकरीता वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करावी.

**ब) विविध वर्गवारीसाठी वापरावयाचा नमुना**

| | |
|---|---|
| १) प्राचार्य/संचालक | - परिशिष्ट - अ |
| २) विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक | - परिशिष्ट - ब |
| ३) अधिकारी / कर्मचारी | - परिशिष्ट - क |

**क) विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही.**

संस्थेचे अध्यक्ष/ सचिव, विभाग प्रमुख / नियंत्रण अधिकारी हे गौरवाकरिता निवड करण्यासाठी आपल्या नियंत्रणाअंतर्गत कार्यरत असलेल्या प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी/ कर्मचारी ह्यांचेकडून प्राप्त अर्जांची छाननी करून प्रस्तुत गौरवाकरिता पात्र ठरू शकणारे गटनिहाय दोन (एक महिलाकरीता) अर्ज अभिप्रायासह शिफारस करतील. सदर अर्ज सहा प्रतीत गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात कुलसचिवांचे नावे सादर करण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१२) सदर विनियमांतर्गत गौरवासाठी निवड करण्याकरीता गठीत केलेल्या समितीच्या शिफारसी स्वीकृत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना राहतील. मा. कुलगुरूंनी प्रदान केलेल्या पुरस्कारांची माहिती व्यवस्थापन परिषदेच्या नियमित सभेपुढे माहितीकरीता सादर करण्यात येईल. तसेच सदरील माहिती विद्यापीठाच्या राजपत्रात तसेच वार्षिक अहवालामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल.

१३) सदर उपक्रमाकरीता पदके तयार करण्याची तसेच दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात येईल.

१४) गौरव पुरस्कारासाठी विहित नमुन्यात अर्ज आलेला नसेल अशावेळेस समिती योग्य वाटणाऱ्या व्यक्तीचे अर्ज त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांकडून मागविण्याचे अधिकार समितीस राहतील.

*****

(परिशिष्ट - अ)

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## आवेदकाचे स्वयं मूल्यमापन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक यांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन संस्थेच्या सचिव /अध्यक्षांमार्फत सादर करावी. अनुक्रमांक २ ते २६ मध्ये संपूर्ण सेवा काळातील माहितीसह नमूद करावे.

प्राचार्य/संचालकाचे नांव : ______________________________

महाविद्यालयाचे नाव : ______________________________ प्रथम नियुक्ती दिनांक ______________

| | | |
|---|---|---|
| १ | प्राचार्य/संचालक म्हणून सलग ३ वर्ष सेवा झालेली आहे काय? | |
| २ | शोधपत्रिकेत प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांची संख्या. (वैयक्तिक) | |
| ३ | प्रकाशित साहित्य / पुस्तके ची संख्या.(वैयक्तीक) | |
| ४ | राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या व उपस्थिती (वैयक्तिक) | |
| ५ | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग. | |
| ६ | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले काय? | |
| ७ | महाविद्यालयाचे नॅक/ एनबीए संस्थेकडून मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे? सद्यस्थितीचा दर्जा/स्कोअर काय आहे? | |
| ८ | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे निकाल/ गुणवत्तेबाबत मागील तीन वर्षाचा आलेख. | |
| ९ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरू केले? | |
| १० | महाविद्यालयातील किती अध्यापकांना / विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहीत करण्यात आले? तद्वतच महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (मेजर) व लघु (मायनर) स्वरूपाचे किती प्रकल्प सादर करण्यात आले आहेत ? तसेच मान्य झालेल्या प्रकल्पांची संख्या | |
| ११ | महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत(भौतिक व शैक्षणिक)? तसेच महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छते संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते? | |
| १२ | महाविद्यालयामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणीक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? | |
| १३ | महाविद्यालयास विविध उपक्रमाबद्दल मिळालेली पारितोषिके | |
| १४ | महाविद्यालयासाठी वित्तीय सहाय्य प्रदान करणाऱ्या संस्थांकडून विविध योजनांकरिता किती अनुदान प्राप्त केले याचा तपशील. | |
| १५ | महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे काय? | |
| १६ | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले? | |
| १७ | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती संख्या आहे. | |

| | | |
|---|---|---|
| १८ | विद्यार्थ्यांचे एन.सी.सी. / एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात.? | |
| १९ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (इंटरनॅशनल पीअर जर्नल) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोधनिबंध प्रकाशित केले. | |
| २० | महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात, अभ्यासात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी कोणती विशेष योजना / प्रयत्न केले जातात ? | |
| २१ | महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात ? | |
| २२ | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते ? महिला तक्रार निवारण कक्ष गठीत केला आहे काय? | |
| २३ | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे, सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्यात येते काय ? | |
| २४ | महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे ? | |
| २५ | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणाऱ्या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत. | |
| २६ | इतर | |

---------------------------------------

स्थळ - स्वाक्षरी

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे अतिरिक्त माहितीसाठी पुरवणी कागद वापरता येईल.*

## Academic Performance Indicaters (API)

1. Name of the applicant as per official record : ..............................................................................

2. Address for correspondence alongwith e-mail ID and mobile number : ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

3. Gender : Male / Female

4. Date of Birth (DD/MM/YYYY) : ....................................................

5. Age as on 31st March ...................................

6. Academic Qualification

| Examination UG/PG | Name of the University | Year of Passing | % of Marks obtained | Division/ Class/ Grade | Subjects/ |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

7. Job Profile (Furnish information in the following table, if appicable)

| Present Status | Designation / Cadre | Name of Employer | Cadrewise Experience in Year | Experience in years related to University Examination work |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

8. Summery of API score of last three years.

* Write the applicable year

| **Sr.No.** | **Category** | **Criteria** | *(Current year) | * (1 year back) | * (2 year back) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| 1 | I | Assessment Criterion for Teaching, Learning and Evaluation Related Activities | | | |
| 2 | II | Involvement in Administrative, Examination, Co-curricular, Extension and Professional Development Related Activities | | | |
| 3 | III | Research and Academic Contribution | | | |

Director/Co-ordinator
IQAC
Sign & Seal

President/Secretary
Sign & Seal

**संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय**

(टिप : प्राचार्य/ संचालकांचे सलग ३ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय )

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

स्थळ : अध्यक्ष / सचिवांची
दिनांक : स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :- -----------------------------------------------------------

*****

## घोषणापत्र

मी, याद्वारे घोषित करतो/करते की, सदर अर्जात वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असून त्यात काही चूकीची अथवा खोटी माहिती आढळल्यास मी नियमानुसार शिक्षेस पात्र राहील.

------------------------------
अर्जदाराची स्वाक्षरी

## सत्यापन

आज दि. ........................................................................... ला याद्वारे सत्यापित करण्यात येते की, वरील अर्जाद्वारे अर्जदाराने नमूद केलेली माहिती मी तपासली असून त्यात कोणतीही अनुचित बाब दडवण्यात आली नाही. करीता सत्यापित करण्यात येत आहे.

-----------------------------
अध्यक्ष/सचिव यांची स्वाक्षरी

(परिशिष्ट -ब)

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## आवेदकाचे स्वयं मुल्यमापन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांकडे सादर करावी. अनुक्रमांक २ ते २२ मध्ये संपूर्ण सेवा काळातील माहितीसह नमूद करावे.

शिक्षकाचे नांव : ______________________________

महाविद्यालयाचे नांव/ विद्यापीठाचे विभागाचे नांव : ______________________________

पदनाम : ____________________ प्रथम नियुक्ती दिनांक ____________________

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठात/महाविद्यालयात सलग ५ वर्ष सेवा झालेली आहे काय? | | | | |
| २ | वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्यात तंत्रज्ञानाचा वापर होतो काय? | | | | |
| ३ | विषयासंबंधीच्या परिषदांमधील सहभाग असल्यास किती? | | | | |
| ४ | शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग, असल्यास किती? (संपादक प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग) | संपादक | प्रकाशक | सल्लागार | परिक्षक |
| ५ | | | | | |
| | प्रकाशित झालेले शोधनिबंध यांची संख्या | | | | |
| ६ | प्रकाशित झालेले पुस्तके (ISBN) यांची संख्या | | | | |
| ७ | आंतरराष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | | | | |
| ८ | राष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | | | | |
| ९ | राज्य स्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | | | | |
| १० | विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | | | | |
| ११ | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग. (सविस्तर माहिती सादर करावी) | | | | |
| १२ | विद्यापीठाच्या प्राधिकारिणांवरील निवड/नियुक्ती (सविस्तर माहिती सादर करावी) | | | | |
| १३ | विभागाच्या विकासात्मक कामातील सहभाग (सविस्तर माहिती सादर करावी) | | | | |
| १४ | संचालित होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभाग (सविस्तर माहिती सादर करावी) | | | | |
| १५ | नॅकचे मानांकन प्रक्रियेत असलेला सहभाग | | | | |
| १६ | राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग | | | | |
| १७ | अभ्यासक्रम पुनर्रचनेमध्ये सहभाग | | | | |
| १८ | विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावरील परीक्षेमध्ये सहभाग | | | | |
| १९ | माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभाग | | | | |
| २० | शिक्षक पालक सभेच्या आयोजनांमध्ये सहभाग | | | | |
| २१ | राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेमिनार/कार्यशाळा/परिषदेच्या आयोजनामध्ये सहभाग | | | | |
| २२ | इतर | | | | |

स्थळ - स्वाक्षरी

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे अतिरिक्त माहितीसाठी पुरवणी कागद वापरता येईल.*

## Academic Performance Indicaters (API)

1. Name of the applicant as per official record : ..............................................................................

2. Address for correspondence alongwith e-mail ID and mobile number : ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

3. Gender : Male / Female

4. Date of Birth (DD/MM/YYYY) : ....................................................

5. Age as on 31st March ....................................

6. Academic Qualification

| Examination UG/PG | Name of the University | Year of Passing | % of Marks obtained | Division/ Class/ Grade | Subjects/ |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

7. Job Profile (Furnish information in the following table, if appicable)

| Present Status | Designation / Cadre | Name of Employer | Cadrewise Experience in Year | Experience in years related to University Examination work |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

8. Summery of API score of last five years.

* Write the applicable year

| Sr.No. | Category | Criteria | *(Current year) | * (1 year back) | * (2 year back) | * (3 year back) | * (4 year back) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| 1 | I | Assessment Criterion for Teaching, Learning and Evaluation Related Activities | | | | | |
| 2 | II | Involvement in Administrative, Examination, Co-curricular, Extension and Professional Development Related Activities | | | | | |
| 3 | III | Research and Academic Contribution | | | | | |

Director/Co-ordinator
IQAC
Sign & Seal

HOD/Principal
Sign & Seal

## विभाग प्रमुख / प्राचार्य / संचालकांचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ / महाविद्यालयातील शिक्षकांचे संदर्भात संबंधित शिक्षकाचे सलग ५ वर्षे सेवेबाबतच्या अभिप्रायासह मागील सलग ५ वर्षे सेवेच्या गोपनिय अहवालाचे अंश नमूद करुन त्यासंबंधी अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. )

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

स्थळ : प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुखांची
दिनांक : स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :- ------------------------------------------------------------------------------------------

*****

## घोषणापत्र

मी, याद्वारे घोषित करतो/करते की, सदर अर्जात वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असून त्यात काही चूकीची अथवा खोटी माहिती आढळल्यास मी नियमानुसार शिक्षेस पात्र राहील.

------------------------------
अर्जदाराची स्वाक्षरी

## सत्यापन

आज दि. ........................................................................... ला याद्वारे सत्यापित करण्यात येते की, वरील अर्जाद्वारे अर्जदाराने नमूद केलेली माहिती मी तपासली असून त्यात कोणतीही अनुचित बाब दडवण्यात आली नाही. करीता सत्यापित करण्यात येत आहे.

------------------------------

प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुखांची स्वाक्षरी

(परिशिष्ट- क)

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**आवेदकाचे स्वयं मूल्यमापन**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ/ संलग्नित महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन नियंत्रण अधिकारी/प्राचार्य/संचालकांकडे सादर करावी.

अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव : ---------------------------------------------------------------------------

विद्यापीठ/महाविद्यालयाचे नाव : -----------------------------------------------------------------------

पदनाम : ___________________ विभाग ___________________ प्रथम नियुक्ती दिनांक ________

| | | |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | |
| २ | सलग ५ वर्ष सेवा झालेली आहे काय? | |
| ३ | कार्यालयातील उपस्थितीचे प्रमाण | |
| ४ | कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा. | |
| ५ | वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण | |
| ६ | कार्यालयीन कामकाजात आणलेली नाविन्यता | |
| ७ | कार्यालयीन कामकाजात सुलभता आणण्यासाठी केलेले प्रयत्न | |
| ८ | गोपनीय दर्जाचे काम/कागदपत्रे सांभाळण्याची जबाबदारी. | |
| ९ | कार्यालयीन कामकाजाचा स्तर उंचावण्याकरिता केलेले उल्लेखनीय प्रयत्न व योगदान | |
| १० | वरिष्ठांशी,सहकाऱ्यांशी व जनतेशी संबंध | |
| ११ | कार्यालयीन कामाबाबत कर्मचाऱ्यांमध्ये बांधीलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न | |
| १२ | विश्वसनीयता | |
| १३ | कार्यालयीन कामात सहकाऱ्यांना केलेल्या मदतीचे स्वरुप. | |
| १४ | कार्यालयीन काम करण्याची रुची व तसे योगदान | |
| १५ | प्रशासकिय कार्यात घेतलेले निर्णय (लागू असल्यास) | |
| १६ | कार्यालयीन कामातील दूरदर्शीता (Vision) व त्याच्या अंमलबजावणीकरीता केलेला प्रयत्न | |
| १७ | अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याची पद्धती | |
| १८ | विद्यापीठ/महाविद्यालयात नॅकचे मानांकन प्रक्रियेत असलेले योगदान | |
| १९ | कार्यालयीन कामकाजाचे प्रशिक्षण घेतले काय? | |
| २० | कार्यपुर्तीसाठी कार्याचे विभाजन व नियोजन केले काय? त्याचा तपशिल | |
| २१ | इतर | |

स्थळ -

दिनांक -

--------------------------------------------

स्वाक्षरी

*टिप : आवश्यक तेथे अतिरिक्त माहितीसाठी पुरवणी कागद वापरता येईल.*

## प्राचार्य /संचालक/ नियंत्रण अधिकाऱ्याचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ/महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे संदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे सलग ५ वर्षाचे सेवेबाबतच्या अभिप्रायासह मागील सलग ५ वर्षाच्या गोपनिय अहवालाचे अंश नमूद करुन त्यासंबंधी अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडाव्यात.)

स्थळ :　　　　　　　　　　　　प्राचार्य/ संचालक/ नियंत्रण अधिकाऱ्याची
दिनांक :　　　　　　　　　　　　स्वाक्षरी व शिक्का

परिशिष्ट 'ड'



# संत गाडगे बाबा
# अमरावती विद्यापीठ

## उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार

**डॉ./श्री./श्रीमती** ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

आपण आपल्या आजपर्यंतच्या सेवाकाळात विद्यापीठाला उल्लेखनीय सेवा दिली. आपण दिलेल्या उत्कृष्ट सेवा विद्यापीठाच्या विकासात व प्रतिष्ठेत भर घालणाऱ्या आहेत. आपल्या या प्रशंसनीय सेवेबद्दल हे गौरव प्रमाणपत्र आपणांस प्रदान करण्यात येत आहे.

दि.१ मे २०......                                        कुलगुरू

परिशिष्ट ' इ '

## पदकाचा नमुना

एक बाजु

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन

उत्कृष्ट सेवा

गौरव प्राप्त ---------------- *

१ मे, २०...

दुसरी बाजु

* -- अधिकारी
* -- प्राचार्य
* -- शिक्षक
* -- शिक्षकेत्तर कर्मचारी